SHIVAJI COLLEGE HINGOLI

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

23 March 2019, Special Issue- 168 (II)

# Globalisation : Challenges and Opportunities for India

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Shivaji Dalnar
Principal
Punyashlok Ahilyadevi Holkar Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

**Co-Editor**
Dr. Bonnar R.Y.
Dept. of Economics
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

Prof. Sonner V.B.
Dept. of Political Science
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

RESEARCH JOURNEY

...ge, HINGOLI

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

# भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

प्रा. के.जे. खंदारे
लोकप्रशासन विभाग, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**प्रस्तावना**

आधुनिक काळात बहुतांशी राष्ट्रांनी लोकशाही शासनपध्दती स्विकारलेली आहे. लोकशाही शासनप्रकाराच्या विविध पध्दती आहेत. उदा. प्रातिनिधीक लोकशाही, संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही, नियंत्रित व मार्गदर्शक लोकशाही अशा विविध स्वरूपाच्या लोकशाही शासनपध्दती अस्तित्वात असलेल्या दिसतात. तिसऱ्या जगातील बहुसंख्य राष्ट्रात लोकशाही शासन पध्दती आहे. परंतु स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता व धर्मनिरपेक्षत या तत्वाची उपेक्षाच झालेली आहे. जागतिक, आर्थिक व आण्विक स्पर्धा, भांडवलशाही देशांची आर्थिक मक्तेदारी, वाढता दहशतवाद, आक्रमक राष्ट्रवाद, सामाजिक अस्थिरता, सांस्कृतिक असमतोल अशा विविध समस्यांनी तिसऱ्या जगातील लोकशाही ग्रासलेली आहे. त्यामुळे लोकशाही शासनपध्दती अस्थिर व अस्थायी झाली आहे. प्रादेशिकता, धर्मांधता, जातीयता, जमातवाद, भाषावाद, अज्ञान, अशिक्षितपणा, दारिद्र्य, बेकारी इ. आव्हाने लोकशाहीसमारे उभी राहिलेली आहेत. सामाजिक व आर्थिक असमानता कमी करणे, प्रादेशिक असमतोल दूर करणे, धर्मांधता, जातीवाद, जमातवाद, मुलतत्ववाद यांना प्रतिबंध करणे, निरक्षरता कमी करणे, दारिद्र्य निर्मुलन करणे, अशी आव्हाने लोकशाही व्यवस्थांपुढे आहेत. अर्थात ही आव्हाने स्विकारून लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सर्वच लोकशाही राष्ट्रांनी सुरू केलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:–**

1) लोकशाही पुढील आव्हानांचे अध्ययन करणे.
2) लोकशाहीपुएम्ल आव्हानांवर उपाय सूचविणे.
3) लोकशाहीतील आव्हाने कमी करण्यासाठी प्रयत्न करणे.

**लोकशाहीसमोरील आव्हाने:–**

1) धर्मांधता:– भारतीय लोकशाही शासन पध्दतीव्दारे समाज व्यवस्थेत सामाजिक विषमता आढळते. धर्म, वंश, पंथ, व्यवसाय, दर्जा इत्यादी कारणांनी समाजात विषमता निर्माण होत आहे. भारतीय समाजात धर्मांधता, वर्णभेद, जातीयता, जमातवाद अशी सामाजिक विषमता आढळून येते. धर्मांधतेमुळे लोक आपल्या धर्माचे संरक्षण, पालन करतात आणि अन्य धर्मांना विरोध करतांना दिसतात.

2) जातीयता:– भारतीय राजकारणावर सामाजिक विषमतेचा प्रभाव आहे. राजकीय नेते लोकांच्या धार्मिक व जातीयेतच्या भावना चेतवून त्यांची मते मिळविण्यासाठी प्रयत्न करती असतात. भारतीय समाज वर्णव्यवस्थेवर आधारलेला आहे. भारतात अज्ञान, निरक्षरता इ. समस्या देखील आढळतात. वर्णव्यवस्थेचे रूपांतर जातीमध्ये झालेले आहे. जाती, जातीभेद, संघर्ष, तिरस्कार यामुळे लोकशाही धोक्यात येवू शकते.

3) प्रादेशिकता:– लोकशाही राष्ट्रात समतोल बिघडल्यामुळे लोकशाही धोक्यात येत आहे. वेळप्रसंगी प्रादेशिक निष्ठा आणि प्रांताभिमान वाढल्यामुळे राष्ट्राचे विघटन होण्याची भिती वाटायला लागते. प्रादेशिकता हा लोकशाहीपुढील मोठा अडथळा आहे.

4) आर्थिक असमानता व दारिद्र्य:– आर्थिक असमानता, आर्थिक विषमता, दारिद्र्य, बेकारी, उपासमार इ. आर्थिक कारणामुळे लोकशाही शासनपध्दती अस्थिर व अयशस्वी होत आहे. ज्या देशात आर्थिक समता प्रस्थापित होते तो देशच खऱ्या अर्थाने लोकशाहीप्रधान असतो. भारतीय लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर देशात आर्थिक व सामाजिक समता निर्माण होणे अपेक्षित असते.

5) राजकारणाचे गुन्हेगारीकरण:– राजकारणातील वाढती गुन्हेगारी ही एक मोठी समस्या निर्माण झालेली आहे. 1980 नंतर देशाच्या राजकारणात गुन्हेगारीचे प्रमाण वाढू लागले आहे. भारतीय राजकारणातल सध्याच्या गुन्हेगारीचे चित्र फार भीषण व भयानक आहे.

6) दहशतवादी कारवाया:– भारतीय लोकशाहीपुढील एक महत्वाचे आणि भयंकर आव्हान म्हणजे दहशतवाद होय. मागच्या महिन्यात जम्मू–कश्मिरीमधील पुलवामा जिल्हयात झालेला दहशतवादी भ्याड हल्ला यात जवळपास 50 भारतीय जवान शहीद झाले आणि त्या प्रदेशात जवळपास 8–10 दिवस ही दहशत निर्माण झालेली होती. हे सुध्दा लोकशाही पुढील एक आव्हानच आहे.

7) भाषावाद:– भारतात देशातील जनता ही बहूभाषिक आहे म्हणजे येथे विविध भाषा बोलल्या जातात. परंतु काही नागरिक स्वतःच्या भाषेला महत्व देतात व इतरांच्या भाषेला ते दुय्यम मानतात. त्यामुळे भाषिक विषमता निर्माण होते.

8) भ्रष्टाचार:– भ्रष्टाचार हे एक लोकशाहीपुढील आव्हान आहे कारण यामुळे संपूर्ण देश भ्रष्टाचारने होरपळून निघालेला आहे. ही समस्या सर्वच क्षेत्रात आढळून येतांना आपल्याला दिसते. यामुळे देखील लोकशाही कमकुव बनत चाललेली आहे.

**लोकशाहीपुढील आव्हानावर उपाय:–**

1) लोकशाही मुल्यांचे जतन व अंगीकार करणे गरजेचे आहे.
2) शिक्षणातून नागरिकांची मानसिकता बदलता येते.
3) महिलांना सक्षम करणे महत्वाचे आहे.
4) राजकीय गुन्हेगारी, भ्रष्टाचार या वर कडक नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.
5) आर्थिक व सामाजिक समता निर्माण होणे अपेक्षीतच आहे.
6) लोकशाही संस्कार देणाऱ्या संस्थांना प्रेरणा देणे महत्वाचे आहे.

PRINCIPAL
Shivaji Coll…

**निष्कर्ष:–**

लोकशाही शासनपध्दती ही जनतेच्या मान्यतेवर आधारीत असते. स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता इत्यादींचा अंगीकार त्यात असतो. या शासनपध्दतीमुळे देशाच्या प्रगतीची वाटचाल महत्वपूर्ण मानली जाते. परंतु आज याच लोकशाही शासनपध्दतीत विविध



RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

अडथळे येतांना आपल्याला दिसतात. हे सर्व अडथळे मनुष्य निर्मित आहेत. या अडथळयांचे प्रमाण कमी करून निश्चितच लोकशाही सुदृढ करण्यास आपल्याला हातभार लागतो. आज जगातील बहुतांशी देशांनी हीच शासनपध्दती स्विकारलेली आहे. कारण इतर शासन पध्दतीपेक्षा हीच शासनपध्दती जनतेच्या सार्वभौमत्वाला प्राधान्य देते.

**संदर्भग्रंथ सूची:–**

1) भारतीय शासन व राजकारण, सुधाकर जोशी, विद्या बुक्स प्रकाशन, औरंगाबाद.
2) भारतीय लोकशाही, राजशेखर सोलापूरे,-चिन्मय प्रकाशन, नांदेड.
3) भारतीय प्रशासन, के.आर. बंग, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.
4) Indian Polity, M. Laxminath, Tata Magrath Publication, Delhi.

PRINCIPAL
Shivaji Col…